-::: कार्यालय ::-
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया यांचे कार्यालय
लिल्हारे बिल्डींग, वसंत नगर, बालाघाट रोड, गोंदिया जिल्हा गोंदिया
Email ID :- arcs_gnd@rediffmail.com दुरध्वनी क्र.07182-253177

क्रंसनिगों/नियमन/कलम77/आदेश/ 424 /2018 दिनांक :- 96/2/98

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 (अ)(1)(ब)(दोन) सहवाचन कलम 73 अअअ (3)अतंर्गत आदेश

ज्याअर्थी, **झुलेलाल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. गोंदिया र.नं.** 695 तालुका गोंदिया जिल्हा गोंदिया ही संस्था (जीचा या पुढे केवळ सहकारी संस्था म्हणुन उल्लेख केलेला आहे.) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अंतर्गत नोदणीकृत सहकारी संस्था असुन सदर संस्थेला कायदा,नियम व पोटनियमातील तरतुदीनुसार कामकाज करणे बंधनकारक आहे व सदर संस्था ही या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व पोटनियमातील तरतुदीनुसार समिती सदस्यांचा कार्यकाळ 5 वर्ष इतका आहे व या कार्यालयाच्या अभिलेखानुसार सदर संस्थेच्या समिती सदस्याच्या पदावधी दिनांक 22/4/2016 रोजी सपुष्टात आलेला आहे.आणि,

ज्याआर्थी भारताचे संविधान (97 घटना दुरूस्ती) अधिनियम 2011 नुसार सुधारीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 अअअ (3) नुसार समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांच्या आणि तीच्या पदाधिका-याची मुदत समितीच्या मुदती इतकीच असेल अशी स्पष्ट तरतुद आहे.त्यामुळे विद्यमान व्यवस्थापन समितीच्या कालावधी समाप्त झाल्यामुळे आणि व्यवस्थापन समितीच्या कार्यकाळ वाढविण्यासाठी मुदतवाढीची तरतुद सहकारी कायदयात नसल्यामुळे अशा समितीला पुढील काळासाठी काम करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार प्राप्त होत नाही.आणि,

ज्याआर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ चे पोटकलम (ब) मधील तरतुदीनुसार कोणत्याही संस्थेच्या समितीच्या किंवा तीच्या कोणत्याही सदस्याच्या पदावधी संपला म्हणून प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबत स्पष्ट तरतुद असुन या तरतुदीनुसार **झुलेलाल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. गोंदिया र.नं.** 695 या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सदस्याच्या कालावधी दिनांक 22/4/2016 रोजी सपुष्टात आल्यामुळे उक्त संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाली असुन कलम77 अ खंड (दोन) मधील तरतुदीनुसार नवीन समिती पदग्रहन करेपर्यंत प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.तसेच कलम 73 अअअ चे पोटकलक (3) मधील तरुद विचारात घेता विद्यामान संचालक मंडळाच्या पदावधी संपल्यावर मुदतवाढीची तरतुद उपलब्ध नाही.त्यामुळे उक्त संस्थेवर कलम 77 अ (ब) (दोन) मधील तरतुदीनुसार नवीन समिती पदग्रहन करेपर्यंत उक्त संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी प्रभावाने प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे अनिवार्य झाले आहे.तसेच कलम 77 अ च्या तरतुदीतील परंतुकानुसार अशा परिस्थितीत प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या आदेश काढण्यापुर्वी यासंबधातील हरकती व सुचना मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करणे वाजवीरित्या व्यवहार्य तथा आवश्यक ठरत नाही.अशी माझी खात्री झाली आहे.त्याआर्थी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-// आदेश //-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77-अ (1)(ब) (दोन) सहवाचन कलम 77 अअअ (3) अतंर्गत तरतुद व महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.सीएसएल/1493/सीआर-47/15-सी,दिनांक 7 ऑगष्ट 1993 नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, डी.ए. घोडेचोर, सहाय्यक निंबंधक, सहकारी संस्था, तालुका गोंदिया याद्वारे **झुलेलाल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. गोंदिया र.नं.** 695 या संस्थेचे विद्यमान संचालक मंडळ सदस्याचा पदावधी सपुष्टात आल्याने व वैधानिक दृष्टया संस्थेच्या व्यवस्थापनात पोकळी निर्माण झाल्यामुळे विद्यमान संचालक मंडळाऐवजी **श्रीमती एम. पी. ढोरे, मुख्य लिपीक** अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका,गोंदिया यांची प्राधीकृत अधिकारी म्हणून नियुक्ती क रीत आहे.

सदरहू आदेश आज दिनांक 17/2/2018 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित केला आहे.

(डी.ए.घोडेचोर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,तालुका गोंदिया

प्रति,

1. श्री./श्रीमती____________________
   अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव/ संचालक, **झुलेलाल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. गोंदिया र.नं.** 695 यांना माहितीस्तव रवाना.
2. व्यवस्थापक/सचिव, **झुलेलाल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. गोंदिया र.नं.** 695 यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव रवाना. त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर आदेश संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
3. **श्रीमती एम. पी. ढोरे, मुख्य लिपीक** अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका,गोंदिया यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना. त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार तात्काळ स्विकारुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
4. मा.सरव्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.गोंदिया यांना माहितीस्तव सादर.
5. शाखा व्यवस्थापक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.गोंदिया शाखा **गोंदिया** यांना माहितीस्तव रवाना.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर** :- मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,तालुका गोंदिया

o/c